




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

दुःखी माणसाला मदत करण्यासाठी
लांबवलेला एक हात
प्रार्थने साठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा
अधिक उपयुक्त आहे.

– स्वामी विवेकानंद


वर्ष : ०५ | अंक : ३०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१४ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056







## राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणुकीबाबत ठाकरेंच्या शिवसेनेची मोठी मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पार पडली असून सी पी राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपती म्हणून शपथविधी पार पडला. राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून आता ते काम पाहणार आहेत. यामध्ये इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांना पराभव पत्करावा लागला. यामध्ये वादाचा विषय ठरतोय तो क्रॉस व्होटिंगचा. १५ खासदारांचे क्रॉस व्होटिंग झाल्याचे म्हटले जाते. यामुळे विरोधकांच्या एकजूट भंग पावल्याची चर्चा आहे. तर दुसरीकडे बीआरएस, बीजेडी, शिरोमणी अकाली दल या तीन पक्षांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. ज्यामुळे सत्ताधाऱ्यांचे फावले असल्याचे म्हटले जाते. या सर्व घडामोडीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मोठी मागणी केली आहे.




राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकांबाबतीत मतदान प्रक्रियेबाबत महत्त्वाचा मुद्दा उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून उपस्थित करण्यात आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे म्हणणे आहे की, उपराष्ट्रपती निवडणुकीत झालेल्या मतदानातून अनुपस्थित राहण्याचा अधिकार कोणालाही असू नये. मतदान सक्तीचे करण्यात यावे. सर्वोच्च घटनात्मक पदांसाठी मतदानापासून दूर राहणाऱ्या पक्षांची नोंदणी रद्द केली जावी, अशी मोठी मागणी करण्यात आली आहे.

उद्धव ठाकरेंच्या आरोप केला की, भारत राष्ट्र समिती (BRS), बीजेडी तसेच काही अन्य पक्ष मतदानात सहभागी झाले नाहीत. ते नेहमीप्रमाणे केंद्रीय तपास संस्थांना घाबरले आहेत. त्यांनी उपराष्ट्रपती निवडणुकीतून दूर राहण्याचा निर्णय घेतला. लोकप्रतिनिधींनी मतदानात अनुपस्थित राहणे, हे असंवैधानिक आहे. लोकशाहीच्या या प्रक्रियेबाबत गंभीरता न दाखवणाऱ्या पक्षांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, उद्धव ठाकरे गटाचे मुखपत्र 'सामना'मधील संपादकीयात देखील या मुद्यावर कठोर शब्दांत भाष्य करण्यात आले. त्यात स्पष्ट म्हटले की, मतदानापासून दूर राहणे असंवैधानिक आहे. तसेच पक्षाकडून असेही मतदानापासून दूर राहणाऱ्या पक्षावर घोडेबाजारात सहभागी असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

यामुळे उद्धव ठाकरे गटाने मतदान प्रक्रियेत अनुपस्थित राहणाऱ्यांविरोधात तातडीने कारवाई करण्याचा सूर लावला आहे. या मुद्द्यावरून पुढील काही दिवसांमध्ये राजकीय वाद रंगण्याची शक्यता आहे.

## विसापूर गावाच्या हद्दीतील पाणंद रस्त्यासाठी महिला शेतकऱ्यांचा आक्रोश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३ विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तहसील प्रशासनाच्या माध्यमातून १७ सप्टेंबर ते २ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा साजरा करण्यासाठी गुरुवार (दि. ११) रोजी शिवार फेरी काढली. महसूल अधिकारी आरती दुलत यांच्या मार्गदर्शनात व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष शेतशिवारात पाणंद रस्त्यांची पाहणी करण्यात आली. यावेळी शिवारफेरीच्या माध्यमातून विसापूर गावाच्या हद्दीतील पाणंद रस्त्यांची भीषणता लक्षात आली.



यावेळी महिला शेतकऱ्यांनी पाणंद रस्त्यासाठी एकच आक्रोश व्यक्त करून महसूल अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. केवळ शिवार फेरी काढून कार्यभार करू नका, तर पाणंद रस्त्यांची समस्या सोडवा म्हणून जोरदार मागणी केली.

बल्लारपूर तहसील प्रशासनाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा साजरा करण्याचे नियोजन केले आहे. याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यात गावपातळीवर पाणंद रस्ते विषयक मोहिम राबविण्याचे योजले आहे. या मालिकेत गुरुवारी शिवारफेरीचे आयोजन महसूल अधिकारी आरती दुलत यांच्या मार्फत आयोजित केली. या शिवारफेरीत विसापूर येथील सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य शारदा डाहुले, रिना कांबळे, सुरज टोमटे, गजानन पाटणकर, हर्षला टोंगे, वैशाली पुणेकर, सुरेखा ईटनकर, शशिकला जीवने, विद्या देवाळकर यांच्या सह महिला शेतकऱ्यांनी शेतशिवारात पाणंद रस्ते पाहिले.

यावेळी महिला शेतकऱ्यांनी शेतशिवारात पाणंद रस्त्यांची समस्या पहिल्यांदा निकाली काढा. केवळ देखावा म्हणून शिवार फेरी काढू नका, असा सज्जड इशारा महसूल अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना दिला. त्याच वेळी अचानक एका शेतकऱ्यांची बैलबंडी चिखलमय पाणंद रस्त्याने येताच सर्वांचा जीव कासावीस झाला. यावेळी महिला शेतकरी आशा काळे, मंजुषा पावडे, छाया टोंगे, प्रितम पाटणकर, सुलभा टोंगे, प्रफुल्ला डाहुले, सिमा टोंगे, अश्विनी काळे, पुजा डाहुले, शारदा पावडे, मंदा टोंगे, वर्षा टोंगे, मंजुषा ताजने, तानेबाई टोंगे, मंजुषा टोंगे, ललिता टोंगे, मंजुषा अमित पावडे आदींनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना पाणंद रस्त्यांच्या समस्यासाठी फैलावर घेतले. शेतशिवारातील पाणंद रस्त्यांची समस्या निकाली काढण्यासाठी आक्रोश केला.

## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात चंद्रपूर जिल्हा अव्वल असावा : पालकमंत्री डॉ. उईके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राज्यात राबविण्यात येत आहे. १०० दिवसांचे आणि १०० गुणांचे हे उत्कृष्ट अभियान असून यात प्रत्येक ग्रामपंचायत सक्षम होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींनी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपला जिल्हा राज्यात अव्वल राहील, यासाठी सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिल्या. जिल्हा परिषदेच्या वतीने प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात आयोजित मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे दूरदृश्यप्रणालीद्वारे उद्घाटन करताना ते बोलत होते.

यावेळी मंचावर आ. सुधाकर अडबाले, आ. किशोर जोरगेवार, आ. देवराव भोंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळुंके( पंचायत), नुतन सावंत (सामान्य), शिक्षणाधिकारी(माध्य.) राजेश पातळे, अश्विनी केळकर (प्राथ.), मान्याची वाडी गावचे (ता. पाटण, जि. सातारा) सरपंच रविंद्र माने आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, या अभियानामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायती अधिक सक्षम, पारदर्शक, जलसमृध्द, उपजिविका विकास, सामाजिक न्याय आदी बाबतीत स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. लोकसहभागातून ज्या ग्रामपंचायती उत्कृष्ट कार्य करतील त्यांना जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर सन्मानित करण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ सेवा पंधरवाड्यापासून म्हणजे १७ सप्टेबर पासून सुरु होईल. संपूर्ण राज्यात १०० दिवस म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत हे अभियान राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात जिल्हा राज्यात प्रथम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी आ. सुधाकर अडबाले, आ. किशोर जोरगेवार, आ. देवराव भोंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीसुध्दा मनोगत व्यक्त केले.




**आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराचे वितरण**


**ग्रामपंचायतींनी ध्येय ठेवून काम करावे : रवींद्र माने**

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान हे गावाचा चेहरामोहरा बदलविणारे अभियान आहे. केवळ उत्पन्नावर ग्रामपंचायत चालत नसते तर वेगवेगळ्या अभियानात सहभागी होऊन पुरस्काराच्या माध्यमातून आपण आपली ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम करु शकतो. पुरस्काराच्या रकमेतून गावाचा व गावातील प्रत्येक कुटूंबाचा विकास करणे शक्य आहे. मात्र, त्यासाठी ग्रामपंचायतीनी ध्येय ठेवून काम करावे, असा सल्ला केंद्र आणि राज्य शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी गावचे सरपंच रवींद्र माने यांनी उपस्थित सरपंचांना दिला.

## बुलढाण्यातही मयुरीसारखी घटना, राहत्या घरात विवाहितेने जीव दिला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव एका विवाहितेने राहत्या घरात गळफास घेत आपल्या आयुष्याची अखेर केली. शेगाव येथील व्यंकटेश नगरात बुधवारी (१० सप्टेंबर) संध्याकाळी सहा ते सात वाजेच्या दरम्यान या विवाहितेने जीव दिला. दिपाली विशाल बेलोकार (वय ३०) असं या विवाहितेचं नाव असल्याची माहिती आहे.



दिपाली बेलोकार या विवाहितेने शेगावात राहत्या घरात साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आपलं आयुष्य संपवलं. सासरच्यांच्या त्रासामुळे दिपालीने हे टोकाचं पाऊल उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे. जीव दिलेल्या दिपालीच्या आईने याप्रकरणी शहर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. यामध्ये, पतीकडून सातत्याने होणारा छळ, मारहाण आणि शिवीगाळ या मानसिक त्रासाला कंटाळून दिपालीने हा टोकाचा निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलिसांनी तोंडी रिपोर्टवरून संबंधित पतीवर भारतीय न्याय संहिता कलम १०८ व ३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या सर्व घटनाक्रमाला तिचा मोठे दीर संदीप सुपडा बेलोकार, प्रदीप सुपडा बेलोकार, जावा गंगा संदीप बेलोकार, जया प्रदीप बेलोकार या जबाबदार असल्याचंही तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु असल्याची माहिती आहे. मात्र, या घटनेने दिपालीच्या माहेरच्यांना मोठा धक्का बसला असून दिपालीच्या आईच्या डोळ्यातील अश्रू थांबत नाहीये.

## ३४ जिल्हा परिषदांमध्ये अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर ; ठाण्याचे अध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, ठाणे :** राज्यात पुढील काही दिवसातच जिल्हा परिषद निवडणुका सुरू होत आहेत. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या आरक्षणाच्या जीआर नुसार, ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

पुणे अध्यक्षपद सर्वसाधारण गटासाठी जाहीर करण्यात आलं असून साताऱ्यात महिला मागासवर्गीय उमेदवारासाठी अध्यक्षपद असणार आहे. तर पालघर अध्यक्षपदाची जागा ही अनुसुचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, बुलढाणा, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर अशा ८ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण प्रवर्गाचं आरक्षण जाहीर झालं आहे.

सांगली, कोल्हापूर, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या ६ अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर करण्यात आलं आहे.

पालघर, नंदुरबार या दोन जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी अनुसुचित जमाती प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या असून अहिल्यानगर, अकोला, वाशिम या ३ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठी अनुसुचित जामाती महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.

परभणी, हिंगोली, वर्धा या जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद हे अनुसुचित जातीसाठी आरक्षित असल्याचं जाहीर करण्यात आले असून बीड आणि चंद्रपूर जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद अनुसुचित जाती महिला प्रवर्गसाठी आरक्षित असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.

रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, धाराशिव या जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला यासाठी आरक्षित असल्याचं जाहीर करण्यात आलं आले असून सोलापूर, नांदेड, नागपूर, भंडारा या जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षित असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.

**संपूर्ण ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांच्या आरक्षणाची यादी :**

ठाणे – सर्वसाधारण (महिला)
पालघर – अनुसुसूचित जमाती
रायगड – सर्वसाधारण
रत्नागिरी – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
सिंधुदुर्ग – सर्वसाधारण
नाशिक – सर्वसाधारण
धुळे – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
नंदूरबार – अनुसूचित जमाती
जळगांव – सर्वसाधारण
अहिल्यानगर – अनुसूचित जमाती (महिला)
पुणे – सर्वसाधारण
सातारा – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
सांगली – सर्वसाधारण (महिला)
सोलापूर – नागरिकांचा मागास प्रवर्ग
कोल्हापूर – सर्वसाधारण (महिला)
छत्रपती संभाजीनगर – सर्वसाधारण
जालना – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
बीड – अनुसूचित जाती (महिला)
हिंगोली – अनुसूचित जाती
नांदेड – नागरिकांचा मागास प्रवर्ग
धाराशिव – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
लातूर – सर्वसाधारण (महिला)
अमरावती – सर्वसाधारण (महिला)
अकोला – अनुसूचित जमाती (महिला)
परभणी – अनुसूचित जाती
वाशिम – अनुसूचित जमाती (महिला)
बुलढाणा – सर्वसाधारण
यवतमाळ – सर्वसाधारण
नागपूर – नागरिकांचा मागास प्रवर्ग
वर्धा – अनुसूचित जाती
भंडारा – नागरिकांचा मागास प्रवर्ग
गोंदिया – सर्वसाधारण (महिला)
चंद्रपूर – अनुसूचित जाती (महिला)
गडचिरोली – सर्वसाधारण (महिला)




## पिकवावे धन...

विघ्नहर्त्या गणरायाच्या उत्सवाचा जल्लोष टिपेला पोहोचून दरसालाप्रमाणे 'पुढच्या वर्षी लवकर या' म्हणत लाडक्या बाप्पाला निरोप दिला गेला.

राज्याच्या अनेक भागांत प्रतिष्ठापनेच्या दिवशी पावसाने दमदार हजेरी लावली आणि पुढील दहा दिवस 'जलाभिषेक' सुरूच राहिला. या उत्सवाच्या आगमनाला पाऊस झाल्यास तो गणरायाच्या सोंडेत अडकतो, असे ग्रामीण भागात म्हटले जाते. बिथरलेला हत्ती जसा हैदोस घालत सुटतो, तसेच पावसाचे वर्तन असल्याने तो सोंडेत अडकतो, अशी उपमा दिली गेली असावी. असो. शेतशिवारातील खरिपाच्या पिकांची मात्र पावसाने सडघाण केली.

अतिवृष्टीच्या माऱ्याने फळभाज्या, भाजीपाला सडविला. त्याचे परिणाम पितृपंधरवड्यात लगेचच जाणवतील. श्राद्धविधीला लागणाऱ्या भाज्यांसाठी ग्राहकांना अधिकचे पैसे मोजावे लागतील. वास्तविक, पाऊस हा सखा असल्याने आणि त्याच्याशिवाय काहीच भागत नसल्याने शेतकरी त्याच्या लहरीपणाचे, अस्मानी संकटांचे फार मनाला लावून घेत नाही. परंतु, एखादे 'विघ्न' हेतुपुरस्सर आणले जात असेल तर त्याला काय म्हणावे? कांदा, द्राक्षे, केळी आणि कपाशी ही प्रमुख नगदी पिके सध्या एकाच वेळी अडचणीत आली आहेत.

कांद्याचे दर चालू वर्षात शेतकऱ्यांसाठी सावरूच शकलेले नाहीत. बाजारात सहाशे ते सातशे रुपये क्विंटल असा अल्प दर मिळत असतानाच, केंद्राने काही दिवसांपूर्वी खरेदी केलेला तीन लाख टन कांदा बाजारात आणण्यास सुरुवात केली. हे उत्पादन देशभरात रेशनवरून द्यायलाही कोणाची हरकत नाही. परंतु, सरकारचा अनुदानित कांदा खुल्या बाजारात आल्यास उत्पादकांना मिळणाऱ्या चार-दोन रुपयांचा घास हिरावला जाण्याचीच शक्यता. सोबत 'ट्रम्प टेरिफ'मुळे दर आणखी कोसळण्याची भीती. केंद्राने निवडणुकांच्या काळात निर्यात शुल्क हटविले असले, तरी आता श्रीलंका आणि बांगलादेशनेही कांद्यावर दहा टक्के आयातशुल्क लावून भारतीय निर्यातदारांना झटका दिला. कपाशी उत्पादकांच्या वाट्यालाही तेच भोग आले. अमेरिकेने भारतावर लावलेल्या वाढीव 'टेरिफ'मुळे अडचणीत आलेल्या कापड उद्योगाला सावरण्यासाठी केंद्राने नुकतेच कापसावरील अकरा टक्के आयात शुल्क हटवले. यामुळे उद्योगाला अल्प दिलासा मिळणार असला, तरी यामुळे परदेशातून कच्च्या मालाची आयात वाढेल. शेवटी देशात कपाशीचे भाव पडून उत्पादकच भरडले जातील.

केळीचे दर सध्या विक्रमी तीनशे ते चारशे रुपयांपर्यंत घसरले आहेत. दोन आठवड्यांपूर्वी ते दोनअडीच हजार रुपये क्विंटलपर्यंत होते. 'ट्रम्प टेरिफ'चा हा फटका असल्याची अफवा व्यापाऱ्यांनी उठवली. वास्तविक, केळीची निर्यात अमेरिकेत नव्हे, तर आखाती देशांमध्ये सर्वाधिक होते. तरीही बहाणेबाजी करून दर पाडले जात आहेत. 'ट्रम्प टेरिफ'च्या आडून साप-साप ओरडून भुई थोपटण्याचे प्रकार थांबविण्यासाठी सरकारी पातळीवरून प्रयत्न होताना दिसत नाहीत. लहरी हवामानासह चुकीच्या कृषी धोरणांचा फटका बसून द्राक्ष पिकाची झालेली वाताहत सर्व जाणून आहेत. 'द्राक्षपंढरी' ही विभागाची ओळख पुसली जाते की काय, अशी स्थिती आहे. धरसोडीची धोरणे व अक्षम्य दुर्लक्षापोटी एकाच वेळी प्रमुख पिकांवर संकट ओढवले, ज्यामुळे शेतकरी आयुष्यातून उठू शकतो.

उद्योग क्षेत्र वाचायला हवेच; परंतु शेती मरणार नाही, याचीही काळजी घ्यायला हवी. निर्यातदारांना अनुदान देण्याच्या हालचाली सुरू आहेत. मग कृषी क्षेत्रालाही ते द्यायला काय अडचण? 'पिकवावे धन, ज्याची आस करी जन' असे संत तुकोबा म्हणतात. दक्ष राहून शेती करण्याचा संदेश ते देतात, शेतीची मशागत वेळेवरच करणे आवश्यक आहे, वेळ गेल्यावर श्रम वाया जाते, असेही ते निक्षून सांगतात. आगामी काळ कृषी क्षेत्रासाठी प्रचंड आव्हानांचा आहे. नव्या बाजारपेठा शोधेपर्यंत नाशवंत उत्पादन टिकू शकत नाहीत. अशा स्थितीत सरकारी धोरणांची भक्कम साथ लाभल्यास किमान शेतकरी, निर्यातदारांना लढण्यासाठी बळ तरी मिळेल; अन्यथा सारेच मुसळ केरात जायचे!

# माणसानं पाषाणहृदयी की कोमलहृदयी असावं ?

**चिंता चितेपेक्षा दाहक असते!**

माणूस मरणानंतर चितेत जळून संपतो. पण चिंता जिवंत माणसाला आतूनच जाळत राहते. एवढं सारं कळत असूनही आपण स्वतःच्या व्यक्तिमत्त्वानुसार, जडणघडणीप्रमाणे आणि मनशक्तीनुसार कमी-जास्त प्रमाणात घडलेल्या घटनांवर, व्यक्तींवर अथवा भविष्याबाबत चिंता करत असतो.

माणसाने चिंता अर्थात काळजी करावी का?

याचे उत्तर बहुतेक जण कधीच करू नये असंच देतात. पण जो काळजी करत नाही म्हणजेच चिंता करत नाही, तो मला वाटतं पाषाणहृदयीच असावा. कारण काळजी न करणारे दुसऱ्यांच्या भावना समजून घेत नाहीत, भविष्याबाबत आढाखे बांधत नाहीत. असे लोक खरंच पाषाणहृदयी समजावे. वागण्या-बोलण्यात आणि व्यवहारात कठोर असणाऱ्यांना आपण पाषाणहृदयी म्हणतो. दुसऱ्याची अजिबात कदर न करणारे, स्वार्थी वृत्तीचे, निर्दयी लोकसुद्धा पाषाणहृदयीच असतात.

याउलट कोमलहृदयी म्हणजे दुसऱ्यावर प्रेम करणारे, स्वतःची लंगोटी विकून पाहुणचार करणारे, दुसऱ्यांच्या भावनांची कदर करणारे, हळवे, निरागस, भाबडे आणि कृतज्ञ लोक होय.

वरील वर्णनानंतर जर प्रश्न विचारला, माणसाने कसा असावा – पाषाणहृदयी की कोमलहृदयी? तर बहुतेक जण म्हणतील, माणसाने कोमलहृदयी असावं!

खरं तर, व्यक्तिमत्त्व, जडणघडण आणि अनुवंशिक गुणवैशिष्ट्यांमुळे आपण कोमल किंवा पाषाणहृदयी घडतो. कोमलहृदयी लोकांना जीवनात अनेक अडचणी येतात. त्यांच्या चांगुलपणाचा फायदा अनेकजण घेतात. नेबळट, भित्रा अशी विशेषणे त्यांना दिली जातात. अन्याय, अत्याचार सहन करून त्यांना हालाकीचं जीवन जगावं लागतं. त्यांच्याशी आर्थिक फसवणूक केली जाते, इमोशनली ब्लॅकमेल केलं जातं. गरज संपल्यावर त्यांना कोणी विचारतही नाही.

त्याउलट पाषाणहृदयी लोकांशी कोणी सहज कोणतेही व्यवहार करत नाही. त्यांच्यावर फसवणुकीचे डाव क्वचितच चालतात. चिंता न करता ते मानसिक दृष्ट्या सक्षम राहतात आणि आपलं ध्येय कठोरपणे गाठतात. अनेकदा भूतकाळातील दुःखद अनुभव किंवा अन्यायामुळे कोमलहृदयी व्यक्ती पाषाणहृदयी बनतो. तो पुन्हा दुखावला जाऊ नये म्हणून स्वतःभोवती कठोरतेचं कवच बांधतो.

माणसाने फक्त कोमलहृदयी किंवा फक्त पाषाणहृदयी न राहता परिस्थितीनुसार समतोल साधायला हवा.

जर आपण फक्त कोमलहृदयी असू, तर लोक आपल्यावर वर्चस्व गाजवतील, फसवतील, आणि आपलं नुकसान करतील.

जर आपण फक्त पाषाणहृदयी असू, तर लोक आपल्याला दूर ठेवतील, आणि आपल्यावर विश्वास ठेवणार नाहीत.त्यामुळे सर्वोत्तम पर्याय म्हणजे :मनाने कोमल – करुणा, दया, समजूतदारपणा ठेवणे. निर्णयाने कठोर – स्वतःच्या हक्क, तत्त्वे आणि न्यायावर ठाम राहणे.

**उदाहरणार्थ**

**इथे कोमलहृदयी व्हायला हवं:**

१) कुणी चुकलं तर त्याला दुसरी संधी देताना.
२) गरजू, गरीब, आजारी, अशक्त लोकांना मदत करताना.
३) मित्र/कुटुंबीय दुःखात असताना आधार देताना.
४) मुलं, प्राणी आणि निसर्गाशी वागताना.

**इथे पाषाणहृदयी व्हायला हवं:**

१) कुणी वारंवार आपल्याला फसवत असेल तर त्याला थांबवताना.
२) चुकीचं किंवा अन्यायाचं समर्थन नाकारताना.
३) व्यवसाय, अभ्यास किंवा करिअरमध्ये शिस्त पाळताना.
४) वाईट सवयींवर मात करताना (उदा. आळस, वाईट संगत).

हृदय कोमल, पण मन पाषाणासारखं दृढ असावं!



-किशोर जाधव
सोलापूर
मो.९९२२८८२५४१

# भगवान बुद्ध शोपीस नाहीत – त्यांचा सन्मान करा, कचराकुंडीपासून वाचवा!

- प्रवीण बागडे
नागपुर
मो.क्र. ९९२३६२०९१९



आजच्या समाजात एक वेदनादायी वास्तव दिसून येते. या बदलत्या जीवनशैलीत घराची सजावट, सौंदर्यवर्धन आणि दिखाऊपणा याला मोठे महत्त्व दिले जात आहे. घर-सजावटीसाठी बुद्धांच्या मूर्ती मोठ्या उत्साहाने विकत घेतल्या जातात. या सजावटीत अनेकदा भगवान बुद्धांच्या मूर्तींचा समावेश केला जातो. घराच्या ड्रॉइंगरूममध्ये, बागेत किंवा ऑफिस टेबलावर बुद्धाची मूर्ती ठेवली की शांती आणि सकारात्मकता मिळेल, असे मानले जाते. दुर्दैवाने या मूर्तींच्या खऱ्या अर्थाचा, त्यांच्या आध्यात्मिक संदेशाचा विचार अनेकदा होत नाही. शोपीस म्हणून घेतलेल्या या मूर्ती कालांतराने तुटल्या, मळकटल्या किंवा नकोशा झाल्या की त्या सरळ कचराकुंडीत टाकल्या जातात. अशा मूर्ती कचराकुंडीत टाकणे म्हणजे संस्कृतीहीनतेचे लक्षणच म्हणावे लागेल. हे दृश्य अत्यंत वेदनादायी आणि अपमानकारक आहे. हा केवळ मूर्तींचा नव्हे, तर बुद्धांच्या शिकवणीचा अपमान आहे.

भगवान बुद्ध हे केवळ बौद्ध धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी शांततेचा मार्ग दाखवणारे महापुरुष होते. भगवान बुद्ध हे शांततेचे, करुणेचे आणि समतेचे जागतिक प्रतीक असुन त्यांनी करुणा, दया, समता, मैत्री आणि अहिंसा यांचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या शिकवणींनी केवळ भारतालाच नाही, तर जगभरातील लाखो-कोट्यवधी लोकांना जीवनाचा खरा मार्ग दाखवला. त्यांची प्रतिमा ही केवळ सजावटीची वस्तू नसून जीवनातील विवेक व मूल्यांची आठवण करून देणारे प्रतीक आहे. अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या मूर्तीला 'सजावटीचा शोपीस' मानणे आणि त्याचा अनादर करणे ही आपली सांस्कृतिक अधोगतीच म्हणावी लागेल. हे मान्य करावे लागेल की अंधश्रद्धा, फेंगशुई किंवा 'लक' यासाठी मूर्ती ठेवली जाते. परंतु खरेतर मूर्ती ठेवण्यामागे श्रद्धा आणि आदर असणे आवश्यक आहे. शोपीस म्हणून मूर्ती ठेवून तिचा अपमान करणे म्हणजे भगवान बुद्धांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा आणि इतिहासाचा अपमान होय.

समाजाने या बाबतीत संवेदनशील होणे आवश्यक आहे. मूर्ती तुटली तर ती योग्य धार्मिक संस्थांना सुपूर्द करावी किंवा सन्मानपूर्वक विसर्जित करावी. माध्यमे, शाळा व सामाजिक संघटनांनीही जनजागृती करणे गरजेचे आहे. बुद्धांचा खरा सन्मान मूर्ती ठेवण्यात नसून त्यांच्या करुणा, दया आणि विवेक या शिकवणी आचरणात आणण्यात आहे. म्हणूनच लक्षात ठेवू या. भगवान बुद्ध शोपीस नाहीत आणि त्यांच्या प्रतिमा कचराकुंडीकरिता तर अजिबातच नव्हेत. त्यांच्या प्रतिमेचा सन्मान राखणे हेच आपल्या संस्कृतीचे खरे लक्षण आहे. तर चला, बुद्धांना कचराकुंडीपासून वाचवू या; आणि त्यांच्या शिकवणीला आपल्या हृदयात स्थान देऊ या.

# भारतीय हॉकीचे सुवर्णयुग पुन्हा अवतरेल!

भारतीय पुरुष हॉकी संघाने दक्षिण कोरियासारख्या मात्तबर प्रतिस्पर्धी संघाला ४- १ अशा गोल फरकाने मात देत आशिया चषकावर नाव कोरत इतिहास घडवला. बिहारच्या राजगिर येथे नुकतीच आशिया चषक हॉकी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत आशिया खंडातील अनेक दिग्गज देश सहभागी झाले होते.

आशिया चषक सारख्या महत्वाची स्पर्धा जिंकून भारताने हॉकी मधील आपले श्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध केले. याआधीही भारताने पॅरिस आणि टोकियो ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते होते. सलग दोन ऑलिंपिकमध्ये भारताने कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली त्यापाठोपाठ आता आशिया चषकही जिंकण्याची करमत करून भारतीय संघाने इतिहास घडवला. ही स्पर्धा जिंकून भारताने २०२६ साली होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेतील आपले स्थान पक्के केले. संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने दर्जेदार खेळ करत प्रतिस्पर्धी संघाला नामोहरण केले. प्राथमिक आणि सुपर फोर फेरीत भारतच्या सर्वच खेळाडूंनी जीव तोडून खेळ केल्याने भारताला अंतिम फेरी गाठणे सुलभ झाले. अंतिम फेरीत तर भारताने कमाल केली. समोर दक्षिण कोरिया सारखा बलवान संघ असतानाही भारतीय खेळाडूंनी आपला आक्रमक खेळ करत दक्षिण कोरियाचा ४- १ असा धुव्वा उडवला.

अंतिम सामन्यात भारतीय संघाने पहिल्या मिनिटापासून आक्रमक खेळ केला. पहिल्या मिनिटातच भारतीय संघाने पहिला गोल केला. भारताच्या सुखजीत सिंगने हा गोल केला. दिलप्रीत सिंगने २८ व्या मिनिटाला दुसरा गोल केला त्यानेच ४८ व्या मिनिटाला दुसरा गोल केला. अमित रोहिदासने आणखी दोनच मिनिटाने म्हणजे ५० व्या मिनिटाला चौथा गोल केला. दक्षिण कोरियाने प्रतिआक्रमण करण्याचा प्रयत्न केला परंतु भारताची बचाव फळी भेदण्यात त्यांना अपयश आले. या संपूर्ण सामन्यात भारताच्या हॉकी संघाने दर्जेदार खेळ केला त्यामुळेच या स्पर्धेत भारत अंजिक्य ठरला विशेष म्हणजे भारताने तब्बल आठ वर्षानंतर दक्षिण कोरियावर विजय मिळवला.



हॉकी हा भारताचा राष्ट्रीय खेळ आहे. एकेकाळी भारतीय हॉकीचा जगभर दबदबा होता. भारतीय संघाने ऑलिंपिक तर अक्षरशः गाजवून सोडली होती. भारताला सर्वाधिक पदके हॉकी या खेळानेच दिली आहेत. ऑलिम्पिकमध्ये भारताने एकूण १३ पदके जिंकली आहेत. यापैकी ८ सुवर्णपदके, १ रौप्यपदक व ४ कांस्यपदकांचा समावेश आहे. असा विक्रम करणारा भारतीय संघ जगातील एकमेव संघ आहे.

गेल्या काही दशकात भारतीय हॉकीला उतरती कळा लागली एकेकाळी जगावर अधिराज्य गाजवणारा भारतीय हॉकी संघ सर्व महत्वाच्या स्पर्धांमध्ये अपयशी ठरू लागला. प्रेक्षकांचाही हॉकी खेळातील रस कमी होऊ लागला. ऑलिंपिकमध्ये पदक मिळवणे हे आपल्यासाठी स्वप्नच ठरले. १९८० मॉस्को ऑलिंपिकमध्ये भारताने कांस्यपदक जिंकले होते त्यानंतर थेट २०२१ मध्ये टोकियो ऑलिंपिकमध्ये पदक मिळवले. मधल्या काळात भारतीय संघ ऑलिंपिकमध्ये फक्त हजेरी लावून येत होता.

अनेकदा भारताचा क्रमांक शेवटून पहिला असायचा आता मात्र परिस्थिती बदलली आहे. सलग दोन ऑलिंपिक मध्ये कांस्यपदक आणि आता आशिया चषक स्पर्धेत विजेतेपद मिळवून भारतीय हॉकी संघाने भारतीय हॉकी संघाचे सुवर्ण युग परतत असल्याचे संकेत दिले आहे. भारतीय हॉकी साठी हे शुभ चिन्ह आहे. या विजयाने भारतीय हॉकी खेळाला पुन्हा ऊर्जितावस्था मिळेल. या विजेतेपदामुळे देशातील तरुण मुले हॉकी खेळाकडे वळतील. प्रेक्षकही हॉकीवर पूर्वीप्रमाणे प्रेम करतील. भारतीय हॉकीला पुन्हा अच्छे दिन येतील. भारतीय हॉकीचे सुवर्णयुग पुन्हा अवतरेल. आशिया चषक स्पर्धेतील हे विजेतेपद भारतीय हॉकीच्या सुवर्णयुगाची नांदी ठरेल, यात शंका नाही. आशिया चषक विजेत्या भारतीय हॉकी संघाचे मनापासून अभिनंदन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

## बिनचाकी..

नव्यानी पक्ष बांधणी
फिरायालागे टोळकी
जाळी अलगद टाकी
दिसते जिथे घोळकी

उभी राहे निवडणूकी
सुसज्ज सगळीडोकी
चालक मालक तयार
धावे गाडी बिनचाकी

आता आठवण काढे
लागे कुणाची उचकी
लाडात आले सगळे
गालावर मारे टिचकी

बनू पाहे शक्ती शाली
शक्ती असूनि पिचकी
गनिमी काव्याकरिता
मंडळीकाही मोजकी

पाठ कणा ताठ नाही
कंबरा मध्येचं लचकी
दु : स्वप्ने पडू लागली
जे रात्री बेरात्री दचकी

निर्मळहवी मनस्थिती
वृत्ती सोडावी कुजकी
ऊठ सूठ सवय जडते
दे पानसुपारीभाजकी

– हेमंत मुसरीफ, पुणे
मो.९७३०३०६९९६

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# बिले घेतलीत ना, मग कामे अपूर्ण का...?

## जलजीवनाच्या ठेकेदारांना सीईओ भंडारी यांनी सुनावले

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** जलजीवनच्या योजना लवकरात लवकर पूर्ण करून, त्याचे हस्तांतरण करण्याची गरज आहे. तसेच ज्या योजनांच्या कामांसाठी प्रशासनाने ७० टक्के पेक्षा अधिक बिले अदा केलेली आहेत. अशा संबंधित ३८ योजनांची कामे देखील तत्काळ पूर्ण करून घ्या, अशा सक्त सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी ठेकेदारासह प्रशासकीय यंत्रणेला दिल्या. जिल्हा परिषदेतून ८३० योजना घेतल्या आहेत. त्यावर आतापर्यंत ९०० कोटींचा खर्च झाला आहे. तरीही यापैकी केवळ ३४४ योजनाच पूर्ण आहेत. लोकप्रतिनिधींकडून ही योजना, त्यांची कामे, दिलेला खर्च यावरून तक्रारींचा पाढा सुरू आहे, अनेकदा पथकांकडूनही तपासणी केली गेली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर काल मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी सरपंच, ठेकेदार आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यासमवेत बैठक घेऊन पूर्णत्वाकडे असलेल्या साधारणतः ८० पेक्षा अधिक योजनांच्या कामांचा नेमका आढावा घेतला. यावेळी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता हितेंद्र चव्हाण, उप कार्यकारी अभियंता आरळकर, उपअभियंता श्रीरंग गडदे, उपअभियंता आनंद रुपनर, रवींद्र पिसे, जायभाय, पंडीत, कोकरे आदी उपस्थित होते.

यावेळी सीईओ भंडारी यांनी बैठकीत ठेकेदारांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी ठेकेदारांनी खोदकाम केले आहे. मात्र पावसाचे पाणी साचल्याने काम थांबले आहे, ग्राम पंचायत पातळीवर टाकीसाठी जागेची अडचण, गावकऱ्यांकडून वाढीव कामाची मागणी,अशा वेगवेगळ्या समस्या मांडल्या. त्यावर सीईओंनी प्रशासनाला फिल्डवर जाऊन त्या सोडविण्याच्या सूचना केल्या. तसेच टाटा कन्सल्टन्सी, तसेच वेगवेगळ्या समित्यांनी काढलेले ऑडिट पॉईंटवर काम करण्याबाबतही प्रशासकीय यंत्रणेला सूचना केल्या. ऑक्टोबर, नोव्हेंबर अखेर बहुतांशी योजना पूर्ण व्हायला पाहिजेत, असाही वेळ दिला.

दरम्यान, काही योजनांना सुप्रमा करण्याची गरज का आहे. त्यात नेमका इंटरेस्ट कोणाचा आहे. अगोदर स्थानिक स्तरावर आराखडे कोणी तयार केले होते, इत्यादी बाबींचाही सीईओंनी बारकाईने आढावा घेतला.

**आतापर्यंत ८८ योजनांचे हस्तांतरण**

सीईओंनी पदभार घेतल्यापासून जलजीवन योजनांवर विशेष लक्ष केंद्रित केले. योजनांच्या कामांना गती देणे, हस्तांतरण करणे याचा वेळोवेळी आढावा घेतला. यापूर्वी २२ योजना हस्तांतरित झाल्या होत्या. एकाच महिन्यात ही संख्या आता ८८ पर्यंत पोहोचली आहे. योजना हस्तांतरित करताना गावकऱ्यांना विश्वासात घेतले जात आहे. त्यांना योजना चालविण्यासाठी मार्गदर्शन केले जात आहे. जलजीवनच्या ८० पेक्षा अधिक योजनांचा संबंधित सरपंच, ठेकेदार आणि प्रशासकीय यंत्रणेकडून आढावा घेतला. त्यांना ७० टक्के पेक्षा अधिक बिलांची रक्कम दिलेली आहे, त्यांना योजना पूर्ण करण्याच्या सूचना केल्या.

**- आनंद भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी**

# राजकारण न करता विकास कामे करत राहणार : सुजित झावरे पाटील

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** दैठणे गुंजाळ ग्रामस्थांचे झावरे कुटुंबावर नेहमीच प्रेम राहिले आहे. दैठणे गुंजाळ सारख्या ग्रामीण भागात विकास कामे करण्यावर माझा भर आहे.

या भागात अनेक विकासाची कामे मार्गी लावणार आहे. विकास कामे करत असताना कोणतेही राजकारण करणार नसून विकासकामे करणे यावर माझा भर असणार आहे. असे मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.



### दैठणे गुंजाळ येथे श्री खंडेश्वर देवस्थान परिसर सुशोभीकरणाचे भूमिपूजन

दैठणे गुंजाळ येथील श्री खंडेश्वर देवस्थान परिसर सुशोभीकरण व विकास कामांचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. या प्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष नामदेव गुंजाळ, सरपंच बंटी गुंजाळ, माजी सरपंच अशोक केदार, उपसरपंच पोपट जासूद, सबाजी येवले, जयसिंग गुंजाळ, मोहन गुंजाळ, संजय येवले, इंजि.आकाश येवले यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

सुजित झावरे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी ग्रामस्थांच्या मागणीनुसार श्री खंडेश्वर मंदिर परिसरातील भक्तनिवासाचा काँक्रीटीकरणाचा शब्द दिला होता. त्यांनी आपला शब्द पाळत निधी मंजूर करून अवघ्या २४ तासांत काम पूर्ण करण्याचा संकल्प केला. त्यानुसार, या कामाला सुरुवात झाली असून, ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांचे या योगदानाबद्दल सत्कार करून आभार मानले. यावेळी सरपंच, उपसरपंच, देवस्थानचे चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नांमुळे दैठणे गुंजाळ गावात अनेक विकासकामांना गती मिळाली आहे. या विकासकामांमुळे गावाचा चेहरामोहरा बदलत असून, ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

खंडेश्वर मंदिर परिसरात सुशोभीकरणामुळे भक्तांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. सुजित झावरे पाटील यांच्या कार्याला ग्रामस्थांनी दादा दिली.

# बुलडाणा येथे शिवधारा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बुलडाणा :** श्री.शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बुलडाणा येथे शनिवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी शिवधारा उपक्रमांतर्गत प्रमुख मार्गदर्शक पत्रकार यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर प्रमोद कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख, दलित मित्र पंढरीनाथ पाटील, रा.दे.भोंडे सरकार, अ.आ. बाहेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. व्यासपीठावर प्राचार्य कावरे सर, पर्यवेक्षक गजेंद्र राजपूत, शिक्षक व मान्यवर पाहुणे पत्रकार उपस्थित होते.

या मार्गदर्शन शिबिरात प्रमुख मार्गदर्शक पत्रकार म्हणून रणजितसिंग राजपूत, राजेंद्र काळे, ॲड. मृणालताई सावळे, जितेंद्र कायस्थ, विलास सोनुने हे उपस्थित होते. पत्रकारांनी विद्यार्थ्यांना पत्रकारितेचे महत्त्व, समाजातील माध्यमांची भूमिका, सत्य माहितीची जबाबदारी व विद्यार्थ्यांनी घडवायची जबाबदार नागरिकता या विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रश्न विचारले व आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन नितीन ढोमणे यांनी केले. तर प्रास्ताविक मनोज चव्हाण यांनी सादर केले. अध्यक्षीय भाषण पंढरी वाघ यांनी केले. आभार प्रदर्शन हिंगे मॅडम यांनी केले . तसेच विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व कु. देशमुख हिने केले.



या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य श्री.कावरे, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. विशेषतः शिक्षकवृंदातील श्री.देशमुख, वर्षा तायडे, मते मॅडम, श्री.परिहार, श्री.वाघ, श्री.बनसोड, पिवतकर मॅडम, सावळे मॅडम, श्री.मजगे, श्री.भोंडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी मांगे बाबूजी, श्री.ताजी, श्री.कायंदे, श्री.शेवाळे, श्रीवास्तव ताई यांनी मोलाचे सहकार्य केले. सभागृहात विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. वर्ग ९ वा अ विद्यार्थ्यांच्या नियोजनातून संपूर्ण कार्यक्रम उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# कालव्याच्या नवीन कामास तडे... शेतकऱ्यांची कार्यकारी अभियंत्याकडे तक्रार

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** उजव्या कालव्या अंतर्गत सब मायनर काँक्रीट अस्तरीकरणास तडे गेले असून काँक्रीट अस्तरीकरण शेतकऱ्यांनी हाताने उघडून काढून भांडाफोड केला असून याबाबतची लेखी तक्रार कार्यकारी अभियंता उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक - ८ यांच्याकडे केली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित गुत्तेदारावर कारवाई करून काळया यादीत नाव टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.

उर्ध्व पैनगंगा प्रकल्प उजवा कालवा क्र- ४ वरील सब मायनर क्र २ व ४ १० कोटीच्या रुपयांच्या काँक्रीट अस्तरीकरणाचे काम दोन महिन्यांपूर्वीच करण्यात आले आहे परंतु काँक्रीटचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून जागोजागी तडे गेले व खड्डे पडले आहेत. काँक्रीट अस्तरीकरणाची जाडी ७.५ सेंटीमीटर ऐवजी फक्त ३ ते ४ सेंटीमीटर करण्यात आली असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. कालव्याच्या आतील बाजूच्या मुरम अत्यल्प तसेच माती मिश्रित वापरण्यात आले आहे व त्यात पाणी टाकून दबई सुद्धा करण्यात आली नाही. निविदेत प्रस्तावित पॉलिथिन कालव्याच्या दर्शनीय व



रहदारीच्या भागातच वापरण्यात आले आहे इतर ठिकाणी वापर केला नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले.

गुत्तेदाराने काँक्रीट अस्तरीकरणाचे काम एवढ्या खालच्या दर्जाचे केले आहे की काँक्रीट अस्तरीकरणाचे काम हाताने उखडल्या जात असल्याची चित्रफीत शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने कार्यकारी अभियंता यांना दाखविली आहे. शेतकऱ्यांच्या रहदारीचा कालव्याच्या दोन्ही बाजूचा रस्ता प्रस्तावित निविदेप्रमाणे केला नसल्याने या रस्त्यावरून पायी चालणे देखील शेतकऱ्यांसाठी तारेवरची कसरत झाली आहे. संबंधित रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. कार्यकारी अभियंता यांनी उपअभियंता यांना बोलावून शेतकऱ्यांच्या समक्ष खडे बोल सुनावले असून शेतकऱ्यांच्या रहदारीचा रस्ता निविदेप्रमाणे लवकरात लवकर करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत यावेळी माधव देशमुख, संदीप कवळे, श्रीनिवास देशमुख, गंगाधर कोरबनवाड, सुधाकर देशमुख, गौरव देशमुख, गजानन कोरबनवाड, प्रभाकर देशमुख, दिलीप कोरबनवाड यांच्यासह आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने लेखी निवेदनाच्या तक्रारीची सखोल चौकशी केली जाईल तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल. संबंधित गुत्तेदाराचे बिले अदा केली जाणार नाहीत.

**– एस. बी. खेडकर (कार्य.अभियंता उर्ध्व पैनगंगा विभाग क्र.८)**

कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून काँक्रीट हाताने उघडत असल्याने शेतकऱ्यांनीच याचा भांडाफोड केला आहे संबंधित विभागाने या प्रकरणाची सकल चौकशी करून गुत्तेदारास काळया यादीत टाकण्यात यावे.

**– माधव देशमुख (तक्रारदार)**

# थोडक्यात

## कांद्याचे दर घसरल्याने विंचूरला शेतकऱ्यांचा रास्ता रोको



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** विंचूर उपकांदा बाजार समितीत कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने उत्पादन खर्च निघेनासा झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून शनिवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता विंचूर - संभाजीनगर - नाशिक महामार्गावर शेतकऱ्यांनी जंगी रास्ता रोको आंदोलन छेडले. या आंदोलनात पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कांद्याला योग्य भाव द्या, शेतकरी हिताचे धोरण राबवा, सरकार होशात या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सध्या बाजारात सरासरी कांद्याला केवळ २०० ते ३०० रुपये दर मिळत असून, उत्तम प्रतीच्या कांद्यालाही फक्त ८०० ते १००० रुपयांचा भाव मिळतोय. महागडी बियाणे खरेदी करून दुबार रोपवाटिका तयार करताना शेतकऱ्यांनी मजुरटंचाई आणि वाढती मजुरी यांचा सामना केला. मात्र एवढा खर्च करूनही दर घसरल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. आंदोलनाची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. विंचूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी व कर्मचारी यांनी मोठा बंदोबस्त ठेवून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. यावेळी उपस्थित शेतकरी नेत्यांनी इशारा दिला की, कांद्याला हमीभाव मिळाला नाही तर येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## वाई तालुक्यात बिबट्याची दहशत पशुधन धोक्यात

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.१३, वाई (सातारा) :** वाई तालुक्यातील दुर्गम डोंगराळ आशा गाढवेवाडी येथे बिबट्याचा १५ दिवसापासून वावर असून गावातील ४ शेळ्या, ३ कुत्री, वासरू मारून फस्त केले. त्यामुळे गावातील नागरिक भीतीग्रस्त झाले आहेत. जनावरे चारणे सांभाळणे कठीण झाली आहे. बावधन जवळील दरेवाडी या दुर्गम डोंगर कुशीतील गावात बरेच दिवस वावर असून त्याने करावयास गेलेली गेलेली कालवड ठार केली. तसेच ४ - ५ शेळ्यांचा पडसा पडला आहे. त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाई तालुक्याच्या तिन्ही बाजूने डोंगर भाग असून घनदाट झाडीचा भाग असल्याने बिबट्याला लपण्याची जागा सापडली आहे. अशीच डोंगराच्या कुशीत बरीच गावे विसावली आहेत. या भागातील शेतकरी शेतकरी आपली गुरेढोरे शेळ्या मेंढ्या चारण्यासाठी नेतात याचा फायदा घेऊन बिबट्या भक्ष्याच्या शोधात पक्षाच्या शोधात टपून बसलेला असतो. चरण्याच्या नादात असलेल्या जनावरावर हल्ला करून ठार मारतो. भटकी कुत्री रात्रीच्या वेळी बिबट्याच्या तावडीत सापडतात रानात फिरणारी कुत्रे करावयास गेलेल्या शेळ्या मेंढ्या बिबट्याच्या तावडीत सापडतात. अशा घटनांमुळे शेतकरी वर्गाचे आर्थिक नुकसान होत असून पशुधन धोक्यात आली आहे. शेतकरी बिबट्याच्या भीतीने जनावरे शेळ्या मेंढ्या कवडीमोल भावाने विक्री करताना दिसतात. त्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला असून मागील काही दिवसापासून बिबट्याने बऱ्याच गावात दहशत माजवून पशुधन धोक्यात आणले आहे. नागरिकांनी वारंवार वन विभागाला तक्रार करून ही बिबट्याचा बंदोबस्त करण्यात यश आलेले नाही तरी वाई तालुक्यात चाललेली बिबट्याची दहशत बंद करून पशुधन वाचवावे. अशी नागरिकांची मागणी आहे.

## शिव विधी व न्याय विभागाचा तिसरा वर्धापन दिन मातोश्री येथे संपन्न

**अक्षराज : विनोद वास्कर**




**दि.१३, दिवा (ठाणे) :** शिवसेना पक्षप्रमुख आदरणीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिव विधी व न्याय विभागाचा तिसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि कायदेशीर मदत पोहोचवण्यासाठी शिव विधी व न्याय विभाग कशाप्रकारे भक्कम पायरी ठरू शकतो, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उद्धव ठाकरे यांनी आपल्या मार्गदर्शनात अधोरेखित केले की, न्याय ही केवळ न्यायालयीन लढाई नाही, तर तो सामान्य जनतेच्या आयुष्याशी निगडित असलेला विश्वास आहे. आज शिव विधी व न्याय विभाग हा विश्वास जपण्यासाठी खंबीरपणे उभा आहे. यावेळी विशेषतः खासदार अनिल देसाई व आमदार अनिल परब उपस्थित राहून सर्व पदाधिकारी व वकील संघटनांना प्रेरणादायी शब्दांत मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक बळ मिळाले. कार्यक्रमास वकील संघटना मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी न्यायासाठी लढा देण्याचा आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत कायदेशीर मदत पोहोचवण्याचा नवा संकल्प केला. शिव विधी व न्याय विभागाचा हा तिसरा वर्धापन दिन केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता, न्याय व जनतेसाठी लढा देण्याचा नवा उत्साह, नवी जबाबदारी आणि दृढनिश्चय घेऊन साजरा झाला.

## जोगवडी येथे राजे उमाजी नाईक जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१३, जोगवडी (बारामती) :** महाराष्ट्राचे आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. इंग्रजानां सळो की पळो करणारे आद्यक्रांती राजे उमाजी नाईक यांची २३४वी जयंती लोकनेते दौलत नाना शितोळे जय मल्हार क्रांती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात रामोशी, बेडर, बेरड समाजाची उच्चशिक्षित होऊन स्वताच्या अधिकारासाठी लढावे असे प्रतिपादन करण्यात आले. राजुरी गावचे प्रसिद्ध व्याख्याते सागर चव्हाण यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून राजे उमाजी नाईक व त्यांच्या बहीणीं बद्दल चुकीची दंतकथा असल्याचे समाज बांधवा ना सांगितले. ते म्हणाले, राजे उमाजी नाईक यांना त्यांच्या बहीणींनी पकडून नाही दिले तर पकडून देणारे वेगळेच फितूर असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी जय मल्हार क्रांती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दौलत नाना शितोळे, वसंत तात्या मोरे, किरण खोमणे, सुधीर नाईक, रविंद्र बापु जाधव, महेश जाधव, नानासाहेब मदने, मच्छिंद्र खोमणे व मोठ्या प्रमाणात समाज बांधव व भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.